**प्रेसनोट दिनांक ०७/०४/२०१९**

**समर्थ पोलीस ठाणे पुणे**

**फेसबुकवरील मैत्रीतून प्रेमी युगुल पोलीसांकडुन समुपदेशन**

कोल्हापूर येथे रहाणारा युवक विवाहित असून तो नोकरी करीत आहे. त्याचे शिक्षण डिप्लोमा पर्यन्त झालेले आहे. तो सोशल वेबसाईट वर ॲक्टीव्ह असतो. फेसबुकवर स्वतः ॲक्टीव्ह असून फेस बुकवर त्याची ओळख चिपळूण येथे रहाणारी २२ वर्षाचे अविवाहित तरुणी समवेत झाली. दिवसें-दिवस त्यांचे चॅटींगचे माध्यमातून जवळीक वाढू लागली होती. जवळीकीचे रुपांतर कधी प्रेमात झले त्यांचे त्यांना समजले नाही. विशेष म्हणजे तो विवाहित असल्याचे माहित असून देखील तरुणी त्याचे प्रेमात पडली. त्यांनी यापूर्वी मुंबई येथे एकमेकांना समक्ष भेट घेऊन आपले प्रेमसंबंध अधिक दृढ केले.

परंतु त्याने हे आपले फेसबुक प्रेम प्रकरण स्वतःची पत्नी किंवा आई-वडिल यांना सांगितलेले नव्हते. तर तरुणी ही नोकरीचे शोधात होती व तिने देखील आपले घरी या प्रेम प्रकरणाची माहिती दिलेली नव्हती. यानंतर त्या दोघांनी पुणे शहरात भेटायचे ठरवले होते. पुण्या मध्ये सोमवार पेठेत एका लॉजमध्ये हे प्रेमी युगुल आले व तेथे दोन दिवस मुक्काम ठोकला होता. दिनांक ०६/०४/२०१९ रोजी ते दोघे लॉज मधून पुणे स्टेशनकडे रिक्षाने जात असतानाटतरुणी ही रिक्षामध्ये भेदरलेले स्थितीत दिसल्याने मालधक्का चौकात वाहतुक नियंत्रणाचे कर्तव्य बजावत असलेले पोलीसांचे चाणाक्ष नजरेने ते हेरले. त्यांनी रिक्षा थांबवून प्रेमी युगुलाकडे खडसावून चौकशी केली असता ते दोघेही आप-आपले घरातून पळून आलेले असल्याचे समजले. त्यांना जवळच असलेले नरपतगिर पोलीस चौकी येथे त्यांनी आणून सोडले.

पोलीस चौकीत डयुटी असलेले महिला पोलीस हवालदार झरीना सैययद , पोशि.उमेश भोर , पोशि.हेमंत पेरणे व पोशि.शाम सुर्यवंशी यांनी संबंधित प्रेमी युगुलाकडे सविस्तर चौकशी केली असता तरुणीने ती गुहागर येथे नोकरीसाठी तसेच त्याने आपले घरी तो पुण्यात नोकरीसाठी जात आहे अशी बतावणी करुन आला होता. पोलीस चौकीत पोलीसांनी तरुणीचे समुपदेशन केले. तिला युवक हा विवाहित असल्याची व त्यातून निर्माण होणा-या गुंतागुंतीची जाणीव करुन दिली. तेव्हा तरुणीचे डोळे उघडले व तिला आपले चुकीची जाणीव झाली. त्याचे देखील पोलीसांनी समुपदेशन करीत त्याला त्याचे वैवाहिक कर्तव्याची आठवण व जाणीव करुन देऊन फेसबुकच्या आभासी मृगजळामागे न धावण्याची जाणीव करुन दिली. त्याला देखील आपले चुकीची जाणीव झाली. प्रेमी युगुलाने यापुढे पुन्हा न भेटण्याचे मान्य केले. पोलीसांनी दोघांचे कुटुंबियांना बोलावून घेऊन,त्यांना वस्तुस्थितीची माहिती देऊन दोघांनाही त्यांचे कुटंबियांचे ताब्यात सोपविले. अशा प्रकारे प्रेमी युगुलाची पोलीसांनी यशस्वी ताटातूट करुन भविष्यात निर्माण होणारे कौटुंबिक अनर्थापासून त्यांची सोडवणुक केली .